दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २७ जून २०२६ | वर्ष - १ | अंक - २७२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : २७ जून २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : ज्येष्ठ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : त्रयोदशी (रात्री १२:४३ पर्यंत) त्यानंतर चतुर्दशी तिथी नक्षत्र : अनुराधा नक्षत्र (रात्री १०:१० पर्यंत) त्यानंतर ज्येष्ठा नक्षत्र योग : साध्य योग (दुपारी १२:३१ पर्यंत) त्यानंतर शुभ योग करण : कौलव करण (सकाळी ११:३२ पर्यंत)

### 'संतपीठ फेज-२'ची कामे तातडीने पूर्ण करा..!

पिंपरी : जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, टाळगाव चिखली येथील फेज-२ अंतर्गत सुरू असलेली सर्व प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# भाजपच्या कार्यक्रमात जातीवाद चव्हाट्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** UPSC आणि MPSC परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मानासाठी आयोजित करण्यात आलेला सारथी संस्थेचा प्रतिष्ठेचा शासकीय कार्यक्रम अखेर विद्यार्थ्यांच्या यशापेक्षा राजकीय वाद, प्रोटोकॉलचा गोंधळ आणि आरोप-प्रत्यारोपांमुळे चर्चेचा विषय ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्यात पहिल्या रांगेतील आसनावरून निर्माण झालेल्या वादाने प्रशासनाची समन्वय क्षमता, शासकीय प्रोटोकॉलचे पालन आणि सार्वजनिक कार्यक्रमांतील शिष्टाचार यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

माहितीनुसार, कार्यक्रमातील पहिल्या रांगेतील आसन हे प्रोटोकॉलनुसार राज्यसभा सदस्यांसाठी राखीव असल्याचा दावा करत मेधा कुलकर्णी त्या जागेवर बसल्या. त्यानंतर आसनव्यवस्थेवरून निर्माण झालेल्या मतभेदाचे रूप काही क्षणांतच राजकीय संघर्षात बदलल्याचे सांगितले जाते. उपस्थितांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले, तर कार्यक्रमाचा मुख्य उद्देश काही काळ पूर्णपणे झाकोळला गेला.

या घटनेनंतर माध्यमांशी संवाद साधताना मेधा कुलकर्णी यांनी अत्यंत गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना मराठ्यांच्या कार्यक्रमात पुढच्या रांगेत बसणे योग्य नाही असे वक्तव्य ऐकावे लागले. हा दावा सत्य असल्यास, एका शासकीय कार्यक्रमात प्रोटोकॉलच्या वादाला जातीय स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला का, असा प्रश्न निर्माण होत आहे. सार्वजनिक व्यासपीठावर



अशा प्रकारच्या कथित वक्तव्यांमुळे सामाजिक सलोखा आणि प्रशासनाच्या तटस्थतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

कुलकर्णी यांनी आणखी आरोप करत सांगितले की, कार्यक्रमानंतर त्यांना व्हीआयपी लाउंजमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यात आले. यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी पोलिस अधिकाऱ्यांना सूचना दिल्याचा दावाही त्यांनी केला. हे आरोप गंभीर स्वरूपाचे असले तरी, या संदर्भात आमदार अभिमन्यू पवार किंवा संबंधित प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या आरोपांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. या घटनेने शासकीय कार्यक्रमांमध्ये प्रोटोकॉलची अंमलबजावणी नेमकी कशी केली जाते, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लोकप्रतिनिधींच्या पदक्रमानुसार आसनव्यवस्था निश्चित करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असतानाही अशा प्रकारचा गोंधळ निर्माण होणे हे प्रशासनिक नियोजनातील त्रुटीचे द्योतक मानले जात आहे. अशा घटनांमुळे शासनाच्या कार्यक्रमांच्या व्यवस्थापनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

सारथी संस्थेचा हा कार्यक्रम स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. मात्र कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वापेक्षा राजकीय प्रतिष्ठेचा संघर्ष, आसनव्यवस्थेचा वाद आणि आरोप-प्रत्यारोप यांचीच चर्चा रंगली. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव दुय्यम ठरत राजकीय प्रतिमेच्या संघर्षाने संपूर्ण कार्यक्रमावर छाया टाकल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. या घटनेदरम्यान मेधा कुलकर्णी भावनिक झाल्याचेही समोर आले असून, त्यांनी कार्यक्रम अर्धवट सोडल्याची माहिती आहे. त्यामुळे हा वाद केवळ आसनव्यवस्थेपुरता मर्यादित न राहता राजकीय संवादातील सभ्यता, लोकप्रतिनिधींमधील परस्पर आदर आणि शासकीय कार्यक्रमांतील शिष्टाचार याविषयी व्यापक चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, विरोधकांनी या घटनेवरून सरकारवर निशाणा साधण्यास सुरुवात केली असून, सत्ताधारी पक्षातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघड झाल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. मात्र या दाव्यांबाबत अधिकृत पुष्टी झालेली नाही. एकूणच, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्यासाठी आयोजित कार्यक्रम राजकीय प्रतिष्ठा, प्रोटोकॉलवरील वाद आणि गंभीर आरोपांच्या भोवऱ्यात अडकला. या प्रकरणातील सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आणि संबंधित पक्षांची अधिकृत भूमिका स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे मत प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

### सारांश वृत्त

#### कुणाल शाह यांची WhatsApp प्रमुखपदी नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** Meta ने कुणाल शाह यांची WhatsAppMm नेतृत्वासाठी नियुक्ती केली असून ही घडामोड कंपनीच्या भारत-केंद्रित रणनीतीचा महत्त्वाचा भाग मानली जात आहे.

भारत हा WhatsAppMm सर्वात मोठा बाजार असून येथे सुमारे ५० कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत. त्यामुळे कंपनी आता मेसेजिंग ॲपच्या पलीकडे जाऊन पेमेंट्स, व्यवसाय सेवा आणि सुपर ॲप मॉडेल विकसित करण्यावर भर देत आहे. कुणाल शाह यांच्या फिनटेक अनुभवामुळे WhatsApp Pay आणि डिजिटल सेवांचा विस्तार वेगाने होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र UPI आधारित मजबूत स्पर्धा आणि नियामक अडथळे हे मोठे आव्हान राहतील. एकूणच, ही नियुक्ती WhatsAppच्या भारतातील विस्तार आणि महसूल वाढीच्या नव्या टप्प्याची सुरुवात मानली जात आहे.

#### पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत ३ जुलैला मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाला गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. या प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ३ जुलै रोजी विधानभवनात संयुक्त बैठक होणार आहे.

## एमपीएससीच्या पूर्व परीक्षा आता CBT पद्धतीने

### निकाल २१ दिवसांत; भरती प्रक्रियेला वेग देण्याचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) यापुढे सर्व पूर्व परीक्षा संगणकाधारित (CBT) पद्धतीने घेणार असून निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. भरती प्रक्रिया वर्षअखेरीस पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली.

प्रसारमाध्यमांशी बोलताना भीमनवार यांनी सांगितले की, परीक्षांतील विलंब कमी करून उमेदवारांना लवकर निकाल मिळावा यासाठी व्यापक सुधारणा राबवण्यात येत आहेत. नुकत्याच झालेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल २२ दिवसांत जाहीर करण्यात आला असून भविष्यात सर्व पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांत देण्याचा प्रयत्न असेल.

ते म्हणाले की, ज्या वर्षी परीक्षा घेतली जाईल त्याच वर्षी भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुलाखतीच्या पदांसाठी ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षेच्या पदांसाठी ६ ते ७ महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, CBT पद्धत फक्त पूर्व परीक्षांसाठी लागू असेल. मुख्य परीक्षा पूर्वीप्रमाणे पारंपरिक पद्धतीनेच घेतल्या जातील.

**CBT आणि नॉर्मलायझेशन**

ही पद्धत नवीन नसून आयोगाने आतापर्यंत सुमारे १४० परीक्षा या प्रणालीद्वारे घेतल्याचेही त्यांनी सांगितले. ही पद्धत पारदर्शक, जलद आणि न्याय्य असल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे रिक्रूटमेंट बोर्ड आणि राज्यातील CET सेल तसेच NTA यांसारख्या संस्थांकडूनही मोठ्या प्रमाणावर CBT पद्धत वापरली जात असल्याचा दाखला त्यांनी दिला.

CBT प्रणालीमुळे परीक्षा प्रक्रिया अधिक वेगवान होईल, पारदर्शकता वाढेल आणि उमेदवारांचा वेळ वाचेल, असा विश्वास MPSC अध्यक्षांनी व्यक्त केला.

## घोषणांचा ओघ, अंमलबजावणीचा अभाव? आशा सेविका व कंत्राटी कर्मचाऱ्यांना विमा संरक्षणाची सरकारची नवी योजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या आशा स्वयंसेविका आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने कर्मचारी राज्य विमा योजना (एड्ख) लागू करण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी या संदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिल्याने या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या निर्णयाकडे अनेक वर्षांच्या दुर्लक्षानंतर आलेला उशिराचा दिलासा म्हणूनही पाहिले जात आहे.

राज्यातील सुमारे ८४,००० आशा कार्यकर्त्या ग्रामीण व शहरी भागात आरोग्य सेवा पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. लसीकरण, मातृ आरोग्य, जनजागृती आणि प्राथमिक आरोग्य सेवा यामध्ये त्यांचा थेट सहभाग असूनही, त्यांना अद्याप स्थिर रोजगार, पुरेसा मोबदला आणि सामाजिक सुरक्षेची हमी मिळालेली नाही. कंत्राटी स्वरूपात काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांची आर्थिक व आरोग्य सुरक्षितता सतत असुरक्षित अवस्थेत आहे. सरकारच्या प्रस्तावानुसार मासिक २१,००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विविध कंत्राटी कर्मचाऱ्यांना ईएसआयएस योजनेचा लाभ देण्याचा विचार सुरू आहे. यात आशा स्वयंसेविका, राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्च्) कर्मचारी, गट समन्वयक, १०८/१०२ आपत्कालीन सेवा कर्मचारी तसेच इतर कमी उत्पन्न गटातील कामगारांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या योजनेमुळे गंभीर आजार, अपघात आणि प्रसूतीसारख्या परिस्थितीत आर्थिक संरक्षण मिळेल, असा सरकारचा दावा आहे. तथापि, या निर्णयाकडे केवळ प्रशासकीय सुधारणा म्हणून पाहणे पुरेसे नाही. वर्षानुवर्षे अत्यल्प वेतनात आरोग्य व्यवस्था टिकवणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष झाल्याची भावना यामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. विविध संघटनांनी या कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा कवच देण्याची मागणी दीर्घकाळापासून केली आहे. शहरी सहकारी पतसंस्था महासंघ, स्वयंरोजगार संघटना, शिधावाटप कर्मचारी संघटना, खाजगी शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडूनही ईएसआयएस योजनेचा विस्तार करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे हा मुद्दा केवळ आरोग्य क्षेत्रापुरता मर्यादित न राहता व्यापक कंत्राटी कामगार वर्गाशी जोडला गेला आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी या संदर्भात सकारात्मक भूमिका घेत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले असले तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणी हा खरा कसोटीचा मुद्दा ठरणार आहे. अशा अनेक घोषणा यापूर्वीही झाल्या असल्या तरी त्या प्रत्यक्षात प्रभावीपणे लागू झाल्याचा अनुभव मर्यादितच आहे. एकूणच, ही योजना जर प्रत्यक्षात उतरली तर ती हजारो आशा सेविका आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकते. मात्र त्याचवेळी प्रश्न असा उपस्थित होतो कीआरोग्य सेवेचा आधारस्तंभ असलेल्या या कर्मचाऱ्यांना मूलभूत सामाजिक सुरक्षा देण्यासाठी इतका विलंब का झाला?

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विधान भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) जितेंद्र भोळे यांनी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे उपसचिव विजय कोमटवार, वि. स.



पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक तसेच जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही शाहू महाराज यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## विषारी दारूकांडावरून विधानसभेत रणकंदन; जबाबदारी, संवेदनशीलता आणि प्रशासनावर तीव्र प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी चिंचवड परिसरातील विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंच्या गंभीर प्रकरणावरून विधानपरिषदेत गुरुवारी जोरदार गदारोळ झाला. या घटनेत वाढत चाललेला मृतांचा आकडा, प्रशासनाची भूमिका आणि तपास यंत्रणांची कार्यपद्धती यावरून विरोधकांनी सरकारवर तीव्र हल्लाबोल केला. संपूर्ण चर्चेत सभागृहाचे वातावरण तणावपूर्ण बनले आणि अखेर गोंधळातच कामकाज पुढे ढकलण्याची वेळ आली.

विरोधकांनी सरकारवर थेट असंवेदनशील असल्याचा आरोप करत पीडित कुटुंबांना योग्य मदत न मिळाल्याचा मुद्दा उपस्थित केला. अनेक मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार शवविच्छेदनाशिवाय झाल्याने प्रत्यक्ष मृतांचा आकडा अधिक असण्याची शक्यता विरोधकांनी मांडली. तसेच हडपसर, दापोडी, बोपोडी आणि फुगेवाडी परिसरात अवैध दारूविक्रीचे जाळे वर्षानुवर्षे सुरू असूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला.

या प्रकरणातील मुख्य आरोपींवर केवळ उत्पादन शुल्क कायद्याअंतर्गत नव्हे तर सदोष मनुष्यवधासारख्या गंभीर कलमांखाली कारवाई करण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली. तसेच भिवंडीहून मोठ्या प्रमाणात मिथेनॉल पुण्यात कसे पोहोचले, याची सखोल चौकशी करण्याची मागणीही सभागृहात करण्यात आली.

सरकारच्या वतीने गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर देताना सरकारने कोणालाही पाठीशी घातले नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह उत्पादन शुल्क विभागातील अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच आरोपींवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करून तपास सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

मात्र विरोधकांचे समाधान न झाल्याने सभागृहातील वातावरण अधिकच तापले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा पालकमंत्र्यांनी अद्याप पीडित कुटुंबांची भेट घेतलेली नाही, असा मुद्दा विरोधकांनी उपस्थित करत सरकारच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे केले. यावर सरकारने सीआयडी चौकशीचे आदेश दिल्याचा दावा करत प्रशासनाने तातडीने कारवाई केल्याचे सत्ताधाऱ्यांनी सांगितले.

चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली. मंत्री उदय सामंत यांनी विरोधकांच्या भूमिकेवर टीका करत, काही राजकीय पक्ष या प्रकरणाचा वापर राजकीय हेतूसाठी करत असल्याचा आरोप केला. यावर विरोधकांनी तीव्र आक्षेप घेत सभागृहात घोषणाबाजी केली.

सभागृहातील वाढता गोंधळ लक्षात घेऊन सभापती राम शिंदे यांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच महत्त्वाच्या उपाययोजनांकडे राज्यांचे दुर्लक्ष

### एकाही राज्याने सर्व निर्देशांची पूर्ण अंमलबजावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील वाढत्या रस्ते अपघातांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना रस्ता सुरक्षा मजबूत करण्यासाठी सुचविलेल्या पाच महत्त्वाच्या उपाययोजनांची एकाही राज्याने पूर्ण अंमलबजावणी केलेली नसल्याचे समोर आले आहे. द इंडियन एक्स्प्रेसने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, न्यायालयाने वेळोवेळी स्पष्ट निर्देश दिले असतानाही बहुतेक राज्यांमध्ये रस्ता सुरक्षा यंत्रणा अपुरी असल्याचे दिसून आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने रस्ता अपघातांमधील मृत्यू आणि गंभीर जखमींची संख्या कमी करण्यासाठी पाच महत्त्वाच्या उपाययोजनांवर भर दिला होता. त्यामध्ये राज्य रस्ता सुरक्षा परिषद नियमितपणे कार्यरत ठेवणे, जिल्हा रस्ता सुरक्षा समित्या सक्रिय करणे, राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा निधी निर्माण करणे, आघाडीच्या स्वरूपाची स्वतंत्र रस्ता सुरक्षा संस्था स्थापन करणे आणि रस्ता सुरक्षा कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यांचा समावेश आहे.

उपलब्ध माहितीनुसार, अनेक राज्यांनी काही उपाययोजना कागदोपत्री सुरू केल्या असल्या तरी त्या प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवल्या जात नाहीत. काही राज्यांमध्ये रस्ता सुरक्षा परिषद अस्तित्वात असली तरी तिच्या बैठका नियमित होत नाहीत. अनेक ठिकाणी जिल्हा समित्या निष्क्रिय आहेत, तर काही राज्यांनी स्वतंत्र रस्ता सुरक्षा निधीच निर्माण केलेला नाही.

स्वतंत्र 'लीड एजन्सी' स्थापन करण्याच्या न्यायालयाच्या निर्देशांचीही अनेक राज्यांनी पूर्ण अंमलबजावणी केलेली नाही. रस्ता सुरक्षा विषयक विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, अपघातांचे विश्लेषण करणे, प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे नियोजन करणे आणि त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, ही या संस्थेची प्रमुख जबाबदारी अपेक्षित आहे. मात्र, अनेक राज्यांमध्ये अशी यंत्रणा अद्याप प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे अहवालातून दिसून आले आहे. देशात दरवर्षी सुमारे दीड लाखांहून अधिक लोकांचा रस्ते अपघातांमध्ये मृत्यू होतो. त्यामुळे भारत हा रस्ते अपघातांमधील मृत्यूंच्या संख्येत जगातील अग्रगण्य देशांपैकी एक मानला जातो. तज्ज्ञांच्या मते, अपघातानंतर तातडीची वैद्यकीय मदत, धोकादायक ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट्स) सुधारणा, वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी आणि रस्ता सुरक्षा व्यवस्थेचे संस्थात्मक बळकटीकरण यांमुळे मृत्यूंची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

रस्ता सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालय सातत्याने राज्यांना जबाबदारीची जाणीव करून देत आहे. न्यायालयाने यापूर्वीही राज्य सरकारांना नियमित प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, उपलब्ध माहितीनुसार, एकाही राज्याने न्यायालयाने सुचविलेल्या सर्व



पाच उपाययोजनांची संपूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही.

रस्ता सुरक्षा तज्ज्ञांचे मत आहे की, केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची सातत्याने अंमलबजावणी, निधीची उपलब्धता, विविध विभागांमधील समन्वय आणि जबाबदारी निश्चित करणे तितकेच आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास रस्ते अपघातांमधील मृत्यू आणि जखमींची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यास मदत होऊ शकते.

## संपादकीय

### कामराज योजनेची सावली आणि भाजपचे वास्तव

भारतीय राजकारणात दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर संघटना आणि सरकार दोन्हीमध्ये थकवा निर्माण होण्याची शक्यता नेहमीच चर्चेत असते. इंडियन एक्सप्रेस मधील अलीकडील मतलेखात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप संदर्भात अशाच प्रकारच्या फॅटिगचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे आणि त्यावर उपाय म्हणून १९६३ च्या कामराज योजनेसारख्या पुनर्रचनेची कल्पना मांडली आहे. हा प्रस्ताव आकर्षक वाटला तरी त्यामागील वास्तव, राजकीय व्यवहार्यता आणि संघटनात्मक परिणाम यांचे कठोर विश्लेषण आवश्यक आहे.कामराज योजना ही भारतीय राजकारणातील एक दुर्मिळ घटना होती. १९६३ मध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तत्कालीन तमिळनाडूचे मुख्यमंत्री के. कामराज यांनी असा प्रस्ताव दिला की वरिष्ठ केंद्रीय मंत्री आणि काही मुख्यमंत्री यांनी पदाचा राजीनामा देऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पूर्णवेळ काम करावे. त्या काळात पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला संघटनात्मक शिथिलता जाणवत होती. अनेक वरिष्ठ नेत्यांनी हा प्रस्ताव स्वीकारून राजीनामे दिले. या घटनेचा उद्देश स्पष्ट होतासरकारपेक्षा पक्ष संघटना मजबूत करणे. मात्र ही प्रक्रिया पूर्णपणे स्वेच्छेवर आधारित होती आणि त्या काळातील काँग्रेसच्या अंतर्गत रचनेमुळे ती शक्य झाली. आजच्या भाजपसंदर्भात असा कामराज मॉडेल लागू करणे इतके सोपे नाही. गेल्या दशकात भाजपने अत्यंत केंद्रीकृत नेतृत्व मॉडेल विकसित केले आहे. निर्णय प्रक्रियेत पंतप्रधान मोदी यांचे निर्णायक स्थान आहे, तर पक्ष संघटना आणि सरकार यांच्यातील समन्वय वरपासून खालीपर्यंत नियंत्रित स्वरूपात चालतो. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर मंत्र्यांना सरकारमधून काढून पक्ष संघटनेत पाठवणे हे केवळ प्रशासकीय नाही तर राजकीयदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे पाऊल ठरेल.मतलेखात सूचित केलेला फॅटिग म्हणजे केवळ व्यक्तींचा थकवा नव्हे, तर संस्थात्मक साचलेपण. दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने अनेकदा नवे नेतृत्व पुढे येण्याच्या संधी मर्यादित होतात, धोरणात्मक नवकल्पना कमी दिसतात आणि प्रशासकीय यंत्रणा रूटीनवर चालू लागते, हा राजकीय विज्ञानातील सामान्य निरीक्षण आहे. मात्र यावर उपाय म्हणून थेट मोठा फेरबदल हा एकमेव पर्याय आहे असे म्हणणे अति-सुलभीकरण ठरेल.

भाजपच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे संघटनात्मक ताकद. काँग्रेसच्या तुलनेत भाजपची संघटना अधिक शिस्तबद्ध आणि शाखा-आधारित आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असलेला दीर्घकालीन संबंध पक्षाला अतिरिक्त संघटनात्मक बळ देतो. त्यामुळे पक्ष कमजोर झाला आहे म्हणून मंत्र्यांना संघटनेत पाठवा हा युक्तिवाद तितका सरळ नाही. अनेक वेळा पक्ष संघटनेचे काम सरकारमधील प्रमुख नेत्यांच्या प्रभावाशिवायही चालते.

तथापि, दुसरी बाजू दुर्लक्षित करता येत नाही. केंद्रात आणि राज्यांत दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर नेतृत्वाचे नवे चेहरे पुढे आणण्याची गरज निर्माण होते. काही मंत्रालये दीर्घकाळ एकाच चौकटीत राहिल्याने निर्णय प्रक्रियेत लवचिकता कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे नवीन रक्त आणणे हे लोकशाही व्यवस्थेत नेहमीच आवश्यक असते. पण हे काम अचानक कामराज योजनेसारख्या मोठ्या राजीनाम्यांद्वरे करणे राजकीय अस्थिरता निर्माण करू शकते.२०२४ नंतरच्या राजकीय परिस्थितीत भाजप एका वेगळ्या टप्प्यावर आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये स्पष्ट बहुमत असले तरी काही राज्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे. अशा वेळी मोठ्या प्रमाणावर मंत्रिमंडळ बदल केल्यास प्रशासनिक सातत्यावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः अर्थ, गृह, परराष्ट्र यांसारख्या संवेदनशील मंत्रालयांमध्ये वारंवार बदल करणे धोरणात्मक संदेश कमजोर करू शकते.

या पार्श्वभूमीवर, कामराज योजनेची कल्पना ही प्रेरणादायी असली तरी ती आजच्या परिस्थितीत तशीच लागू करणे व्यवहार्य नाही. योग्य पर्याय म्हणजे टप्प्याटप्प्याने पुनर्रचनाजिथे काही वरिष्ठ नेत्यांना पक्ष संघटनेत अधिक सक्रिय भूमिका दिली जाते आणि नव्या नेतृत्वाला सरकारमध्ये संधी दिली जाते. हे बदल स्थिरता राखून केले गेले तरच त्याचा सकारात्मक परिणाम दिसू शकतो.शेवटी, कोणत्याही राजकीय व्यवस्थेत थकवा हा अपरिहार्य घटक असतो, परंतु त्यावर उपायही तितकाच संतुलित असावा लागतो. केवळ ऐतिहासिक उदाहरणांवर आधारित मोठे प्रयोग करणे हे आकर्षक वाटले तरी वास्तव राजकारणात त्याची किंमत जास्त असू शकते. कामराज योजना ही त्या काळाची गरज होती; आजची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे भाजपसाठीही उत्तर हे पूर्णपणे नक्कल नसून समकालीन गरजांनुसार विकसित केलेले असावे, हेच वास्तववादी निष्कर्ष ठरतो.

# प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘स्विच रायफल शूटिंग रेंज व पिस्टल सुविधा’चे उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इान्स्टिट्यूटच्या प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये अत्याधुनिक ‘स्विच रायफल शूटिंग रेंज आणि पिस्टल प्रशिक्षण सुविधा’चे औपचारिक उद्घाटन उत्साहात पार पडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित व शास्त्रीय मार्गदर्शनाखाली नेमबाजी क्रीडा प्रकार शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या सुविधेचे उद्घाटन प्रतिभा ग्रुप ऑफ इान्स्टिट्यूटच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा यांच्या हस्ते आणि प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ .वृंदा जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सोहळ्याला संस्थेच्या संचालिका डॉ . तेजल शहा , शाळेच्या उपप्राचार्या लिजा सोजू , समन्वयीका गुलनाज खान, प्रशिक्षक विजय झुंजारे , राष्ट्रीय खेळाडू प्रमिला कांबळे , डायनॅमिक स्पोर्टस फाउंडेशनचे संस्थापक रमेश वराडे , ज्योती वराडे , किर्ती मिसळ , प्रतीक पांचाळ, भुषण पाटील , आर्या , प्राध्यापक व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ही अत्याधुनिक शूटिंग रेंज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या दूरद्दष्टीतून व मार्गदर्शनाखाली उभारण्यात आली आहे. प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून विद्यार्थ्यांना नेमबाजीचे प्रशिक्षण देण्याविषयी योग्य सुचना व भावी वाटचालीस शुभेच्छा त्यानी दिल्या आहेत.

शालेय विद्यार्थाना पिंपरी चिंचवड रायफल शूटिंग चे प्रशिक्षक विजय रणझुंजारे याच्याकडून दिले जाणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. भूपाली शहा म्हणाल्या, नेमबाजी प्रशिक्षणातून विद्यार्थ्याच्या दैनदीन अभ्यासाबरोबरच त्याचे व्यक्तिमत्व धडण्यास मदत होईल . या प्रशिक्षण सुविधामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शिस्त, अचूकता, आत्मविश्वास आणि खेळाडूवृत्ती वाढविण्यास मदत करेल. क्रीडा हे केवळ शारीरिक आरोग्यासाठी नसून मानसिक दृढतेसाठीही अत्यावश्यक आहे.

शाळेच्या प्राचार्या डॉ. वृंदा जोशी यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात येथे शिक्षण घेणारे शालेय विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता क्रीडा, कला व इतर क्षेत्रात प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. ही शूटिंग रेंज त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, संचालिका डॉ . तेजल शहा यांनी शाळा प्रशासनाला दिलेल्या या रेंजमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपकरणे वापरली गेली असून, प्रत्येक सत्रापूर्वी विद्यार्थ्यांना सुरक्षा नियमांचे पालन करून प्रशिक्षण चे नियम प्रत्येकाला बंधनकारक असेल. तसेच त्याची सुरक्षितताही महत्वाची असेल. ही सुविधा शालेय विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध जीवनशैलीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या उपक्रमामुळे प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलने क्रीडा क्षेत्रात आणखी एक मैलाचा दगड गाठला आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस तसेच पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी शाहू महाराजांना अभिवादन करताना त्यांच्या सामाजिक एकता, शिक्षण, न्याय आणि मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. शाहू महाराजांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक एकता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांचा वारसा भावी पिढ्यांनी जोपासावा, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच कोल्हापूर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग पाटील यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर के.एस.बी. चौक, चिंचवड येथील शाहू महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या दुसऱ्या कार्यक्रमास माजी खासदार अमर साबळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध सामाजिक संस्था, कोल्हापूर जिल्हा मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांनी पुढे नेण्याचे आवाहन करण्यात आले.

# नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे यांची छत्रपती चौक येथे पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** छत्रपती चौक, पिंपळे सौदागर येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. विशेषतः जी. के. गुरुकुल शाळा सुटण्याच्या वेळेत तसेच सकाळ, दुपार व संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांना एक ते दोन तासांपर्यंत वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत होते.

या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे यांनी आज संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांशी चर्चा करून नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झालेले असतानाही किरकोळ कामांसाठी संपूर्ण रस्ता बंद ठेवण्यात आल्याने वाहतूक कोंडी अधिक वाढत असल्याचे निदर्शनास आणून देत डॉ. भिसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना किमान एक मार्ग (वन-वे) तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच येत्या दोन दिवसांत रस्ता वाहतुकीसाठी खुला करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी स्पष्ट सूचना त्यांनी केली.

# सावधान! ‘ट्रॅफिक चलन’चा मेसेज आलाय? लिंकवर क्लिक करताच मोबाईल हॅक करून सव्वा लाखांची ऑनलाईन लूट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आकुर्डी (पिंपरी-चिंचवड):** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याचे भासवून ‘ट्रॅफिक नोटीस’च्या नावाखाली मोबाईलवर बनावट लिंक पाठवून मोबाईल हॅक करण्याचा एक नवा आणि भयानक प्रकार आकुर्डीत समोर आला आहे. मोबाईलचा संपूर्ण ॲक्सेस मिळवून सायबर चोरांनी एका व्यक्तीच्या बँक खात्यातून १ लाख १८ हजार ८२३ रुपये लंपास केले आहेत. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**अशी झाली फसवणूक:**

आकुर्डी येथील दत्तवाडी भागात राहणारे फिर्यादी रवीकेशव ठाकूर (वय ३६) यांच्या मोबाईलवर अज्ञात आरोपींनी व्हॉट्सअॅपवर एक मेसेज पाठवला. यामध्ये तुमची ट्रॅफिक नोटीस (चलन) आली असून ते भरण्यासाठी 'तखएथ उकअडडअछ' आणि 'चझअठखतअकअछ अझघ' अशा फाईल्स पाठवल्या होत्या.

फिर्यादीने खरी ट्रॅफिक नोटीस समजून ती **'APK'** (ॲप्लिकेशन) डाऊनलोड केली. ही फाईल डाऊनलोड होताच त्यांच्या मोबाईलचा संपूर्ण ॲक्सेस (नियंत्रण) समोरील सायबर चोरांकडे गेला.

**क्रेडिट कार्ड आणि शॉपिंग अॅपचा गैरवापर**

मोबाईल हॅक केल्यानंतर आरोपींनी




फिर्यादीच्या फ्लिपकार्ट ॲप्लिकेशनचा वापर केला, तसेच आयसीआयसीआय **(ICICI)** आणि एसबीआय **(SBI)** क्रेडिट कार्डचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने तब्बल १,१८,८२३ रुपयांची खरेदी आणि व्यवहार उरकून घेतले. बँक खात्यातून पैसे कट झाल्याचे मेसेज आल्यानंतर फिर्यादींना धक्का बसला.

निगडी पोलिसांचे आवाहन: निगडी पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात मोबाईल धारकांवर गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. नागरिकांनी व्हॉट्सअॅप किंवा मेसेजवर येणाऱ्या कोणत्याही अनधिकृत .अझघ फाईल्स डाऊनलोड करू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# चिंचवडमध्ये कोयता गँगचा थरार!

## चिंचवडमध्ये कोयत्याचा धाक दाखवून व्यापाऱ्याची लूट; दहशत माजवणारे दोन सराईत गुन्हेगार जेरबंद!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** शहरात कोयता गँगची दहशत संपण्याचे नाव घेत नसून, चिंचवड येथील रामनगर भागात गुरुवारी (२५ जून) रात्री एका मोबाईल शॉपमध्ये शिरून कोयत्याचा धाक दाखवत व्यापाऱ्याला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

**'कलत्या' आणि 'डीजे' जेरबंद**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्ल्या उर्फ सूरज राजू जाधव (वय २७) आणि डीजे उर्फ रोहित हनुमंत मांजरेकर (वय २०, दोघे रा. रामनगर, चिंचवड)



अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

**दुकान फोडले, वस्तू रस्त्यावर फेकल्या!**

फिर्यादी अजय भगवान पवार (वय ३२) यांचे रामनगर येथील मांदरा देवी बिल्डिंग समोर 'बालाजी मोबाईल' व 'बालाजी स्टोअर्स' नावाचे दुकान आहे. रात्री ११:३० च्या सुमारास आरोपी दुकानात घुसले. त्यांनी फिर्यादी यांना कोयत्याचा धाक दाखवून १५०० रुपयांची मागणी केली. पवार यांनी पैसे देण्यास नकार दिला असता, संतप्त आरोपींनी दुकानाच्या काऊंटरची काच फोडली आणि दुकानातील सामान व बरण्या थेट रस्त्यावर फेकून मोठे नुकसान केले.

''आम्ही इथले भाई आहोत, आमच्या नादाला लागाल तर एकाला खल्लास करून टाकू!'' अशी ओरडून परिसरात प्रचंड दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न आरोपींनी केला.

या घटनेनंतर पिंपरी पोलिसांनी तत्परता दाखवत दोन्ही आरोपींना अटक केली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) लोहार या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## हिंजवडीत ६ लाखांची ऑनलाईन फसवणूक!

### आयटी हब हिंजवडीत 'वर्क फ्रॉम होम'च्या नावाखाली ६ लाखांचा गंडा; भामट्यांवर गुन्हा दाखल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हिंजवडी :** आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी परिसरात घरबसल्या चांगल्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ६ लाख ८७ हजार ९८४ रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

असा रचला फसवणुकीचा जाळा

याप्रकरणी लक्ष्मीकांत सुधाकर अंजनकर (वय ३६, रा. आयटीएंड्स होम्स, हिंजवडी) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी 'आपका वर्क' व 'डोलेज इंडिया' या नावाच्या कन्सल्टिंग कंपन्यांच्या अज्ञात धारकांवर भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

नोंदणीच्या नावाखाली उकळले पैसे

आरोपींनी वेगवेगळ्या ईमेल आयडी आणि मोबाईल क्रमांकांवरून फिर्यादींशी संपर्क साधला. ''तुम्हाला आमच्या कंपनीकडून चांगला जॉब मिळवून देऊ,'' असे आमिष दाखवून त्यासाठी रजिस्ट्रेशन फी आणि इतर वेगवेगळ्या कारणांसाठी पैसे भरण्यास भाग पाडले. फिर्यादींनी विश्वासाने एकूण ६,८७,९८४ रुपये आरोपींच्या बँक खात्यावर ट्रान्सफर केले.

मात्र, पैसे घेऊनही नोकरी न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादींच्या लक्षात आले. महिला पोलीस उपनिरीक्षक (मपोउपनि) पाटील या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## सर्वात मोठी कारवाई! शेअर मार्केट आणि क्रिप्टोच्या नावाखाली तब्बल ८८ लाखांचा गंडा; सायबर पोलिसात गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड: परदेशी शेअर मार्केट, स्टॉक मार्केट आणि बिटकॉइनमध्ये गुंतवणूक करून २०० ते ३०० टक्के भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका नागरिकाला तब्बल ८८ लाख २६ हजार ३४२ रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात लिंक धारकासह विविध बँक खातेधारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

तक्रारदार नागरिकाला **'SocialVentureCapitalist'** या लिंकद्वारे संपर्क साधून परदेशी शेअर मार्केट आणि क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणुकीचा सल्ला देण्यात आला होता. सुरुवातीला फिर्यादीने विश्वास ठेवून १ लाख २० हजार ९०० रुपये गुंतवले. त्यानंतर त्यांना मोठ्या प्रमाणात नफा झाल्याचे ऑनलाईन दाखवण्यात आले.

**नफा काढायचा असेल तर आधी पैसे भरा!**

जेव्हा फिर्यादीने आपला झालेला नफा (विड्रॉल) काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपींनी त्यांना विविध तांत्रिक कारणांचे आमिष दाखवले. नफा मिळवण्यासाठी



कधी कन्व्हर्जन फी, फाईलिंग फी, तर कधी कॅपिटल गेन टॅक्स, इन्शुरन्स, सेबी चार्जेस आणि जीएसटीच्या नावाखाली वारंवार पैशांची मागणी केली. आरोपींच्या भूलथापांना बळी पडून फिर्यादीने वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ८८,२६,३४२/- रुपये पाठवले. मात्र, इतकी मोठी रक्कम भरूनही नफा किंवा स्वतःची मुद्दल परत न मिळाल्याने अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसात धाव घेतली.

गुन्हा नोंद: सायबर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३३६, ३३८, ३४०, ३१६(४), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पिंपरी चिंचवडमध्ये उद्या पल्स पोलिओ मोहीम



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उद्या, रविवार दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत ० ते ५ वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्यात येणार असून पालकांनी जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन मुलांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरात सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत ११२३ लसीकरण केंद्रांवर ही मोहीम होणार आहे. तसेच २९ जून ते ३ जुलै या काळात आरोग्य कर्मचारी घरभेटी देऊन वंचित बालकांचे लसीकरण करणार आहेत. या मोहिमेसाठी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. पोलिओपासून संरक्षणासाठी सर्व पात्र बालकांना लसीकरण करणे आवश्यक असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

### चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अनिता ताई काटे, उपाध्यक्षा, चॅलेंजर पब्लिक स्कूल, ज्योतिका मलकानी, प्राचार्या, तसेच स्नेहल पाटील, अपूर्वा पवार आणि प्रिती मानकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यान सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत निरोगी, सुदृढ व संतुलित जीवनासाठी योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचे आवाहन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, शिस्त, एकाग्रता आणि सकारात्मकतेचा संदेश रुजविण्यात आला. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने व प्रभावीपणे पार पाडले, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

## धामणीच्या शेतकऱ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दिलासा

# उपसा जलसिंचन योजनेच्या प्रश्नावर मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे धामणी, पहाडदरा व परिसरातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून उभारलेल्या उपसा जलसिंचन योजनेच्या वीज जोडणीसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीला दादा भुसे आणि प्रताप सरनाईक यांचीही उपस्थिती होती.

धामणी गावातील शेतकऱ्यांनी उपसा जलसिंचन योजनेस वीज जोडणी मिळावी, या मागणीसाठी तीन दिवस अन्नत्याग व बेमुदत उपोषण केले होते. माजी सरपंच सागर जाधव यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनकर्त्यांशी थेट संवाद साधून प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेतले.

त्या अनुषंगाने आज धामणी परिसरातील शेतकरी मुंबई येथे उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन योजनेसमोरील अडचणी, वीज जोडणीचा प्रश्न तसेच शेतीसाठी आवश्यक पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा केली.

बैठकीदरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा यांना संबंधित अधिकाऱ्यांसह तातडीने धामणी येथे भेट देण्याचे निर्देश दिले. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत, सुमारे आठ किलोमीटर अंतरावर, पाणी पूर्ण क्षमतेने पोहोचण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना करण्याचे आदेशही दिले.

धामणी, पहाडदरा व परिसरातील ४२८ शेतकरी कुटुंबांनी कोणतीही शासकीय आर्थिक मदत न घेता स्वतःच्या आर्थिक योगदानातून सुमारे ५ ते ६ किलोमीटर लांबीची पाइपलाईन उभारली आहे. यासाठी तब्बल ६ कोटी ८२ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आले असून या योजनेमुळे ९७८ एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. तसेच जवळपास १,८९१ नागरिकांच्या उपजीविकेला थेट लाभ होणार आहे. मात्र आवश्यक वीज जोडणी उपलब्ध नसल्याने ही योजना गेल्या वर्षभरापासून बंद आहे.



बैठकीत सौरऊर्जेवर योजना कार्यान्वित करण्याच्या पर्यायावरही चर्चा झाली. सौरऊर्जेवर योजना पूर्ण क्षमतेने चालविणे शक्य नसल्यास विशेष बाब म्हणून हायब्रिड प्रणालीद्वारे आवश्यक वीज जोडणी उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष अरुणभाऊ गिरे, शिवसेना युवानेते रमेश येवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, माजी सरपंच सागर जाधव, सरपंच रविंद्र वळसे पाटील, वैभव पोखरकर, किरण ढोबळे, श्रीकांत लोखंडे, अमोल गाढवे, अजित बोर्हाडे, राहुल करंजखेले, उपसरपंच अक्षय विधाटे, अमोल जाधव, शांताराम जाधव, नितीन जाधव यांच्यासह धामणी, पहाडदरा व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने लक्ष देत तातडीने कार्यवाहीचे आश्वासन दिल्याबद्दल तसेच लवकरच धामणी गावाला भेट देणार असल्याचे सांगितल्याने उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

या बैठकीमुळे धामणी परिसरातील दीर्घकालीन पाणीप्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल पडले असून उपसा जलसिंचन योजना लवकरच कार्यान्वित होईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

## निर्जला एकादशी दिनी घाटावर इंद्रायणी आरती हरिनाम गजरात माऊली मंदिरात भाविकांची दर्शनास गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती हरिनाम गजरात झाली. तत्पूर्वी महिला साधकांनी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासली. माऊली मंदिरात परंपरेने निर्जला एकादशी विविध धार्मिक कार्यक्रमांनी हरिनाम गजरात साजरी झाली. माऊली मंदिरातील श्रीचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्प सजावट करण्यात आली होती. श्रीचे दर्शनास भाविकांची गर्दी झाली होती.

मंदिरात निर्जला एकादशी दिनी हरिनामाचा जयघोष उत्साहात झाला. मंदिर प्राकारात भाविकांनी पारायण करीत भक्तिभाव जोपासला. मारुतीबुवा गुरव यांचे पुण्यतिथी निमित्त मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरु असून भाविकांना धार्मिक पर्वणी लाभली असल्याचे संयोजक संकेत वाघमारे आळंदीकर यांनी सांगितले. इंद्रायणी आरती सेवा समिती तर्फे दर एकादशीला होणारी इंद्रायणी आरती उत्साहात झाली. घाटावर उपवासाचे पदार्थासह केळीचे वाटप भाविकांना आरती नंतर झाले. घाटावर भाविकांनी गर्दी करून आरती केली.



या प्रसंगी इंद्रायणी आरती संयोजक अनिता झुजम, सुवर्णाताई काळे, संयोजक अर्जुन मेदनकर, सरस्वती भागवत, सुरेखा काळभोर, काशीबाई अडकिने, केसरबाई कदम, अस्मिता गौर, भागीरथी भागवत, वृंदावनी सोळंके, मनीषा दापके, तारामती गौर, सावित्री घुंडरे, मुद्राका कुडके, अनिता शिंदे, विमल मुसळे, बायडा थोरवे, गोविंद ठाकूर, माऊली घुंडरे, सुयश कदम, गजानन गांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## मालमत्ता करावरील ५ ते ५० टक्क्यांपर्यंतच्या सवलतींचा लाभ घेण्याची अखेरची संधी!

### विविध कर सवलतींचा लाभ ३० जूनपर्यंतच घेता येणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मालमत्ता करावरील आकर्षक सवलतींचा लाभ घेण्यासाठी पिंपरी चिंचवडकरांकडे आता अवघे काहीच दिवस शिल्लक आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून वेळेत कर भरणाऱ्या, ऑनलाइन मालमत्ता कर, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या संस्था आणि आस्थापनांसाठी ५ ते ५० टक्क्यांपर्यंतच्या विविध सवलती देण्यात येत आहेत. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम तारीख असून त्यानंतर पूर्ण कर भरावा लागणार आहे.

महानगरपालिकेने वेळेत कर भरणाऱ्या, ऑनलाइन मालमत्ता कर, महिलांच्या नावावर मालमत्ता असलेल्या तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या नागरिकांसाठी आणि संस्थांसाठी विशेष सवलती लागू केल्या आहेत. अनेक मालमत्ताधारकांनी या सवलतींचा लाभ घेतला आहे. तसेच अनेक मालमत्ताधारकांनी अद्याप कर भरलेला नाही. अशा मालमत्ताधारकांना ३० जून २०२६पूर्वी मालमत्ता कर भरून सवलतींचा लाभ घ्या, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ३० जूनपूर्वी कर भरल्यास मिळणारी ५ टक्के सवलत आणि ऑनलाइन कर भरण्यासाठी मिळणारी अतिरिक्त ५ टक्के सवलत यामुळे पात्र मालमत्ताधारकांना आर्थिक लाभ मिळू शकतो. तसेच महिलांच्या नावावरील निवासी मालमत्तांसाठी ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींसाठी ५० टक्के आणि स्वातंत्र्यसैनिक, विधवा पत्नी यांना मालमत्ता करात सवलत देण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेणाऱ्या गृहनिर्माण संस्था आणि आस्थापनांनाही विविध सवलती दिल्या जात आहेत. कंपोस्टिंग प्रकल्प, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP), झिरो वेस्ट संकल्पना तसेच ग्रीन बिल्डिंग उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना ३ टक्क्यांपासून १५ टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ मिळू शकतो.

## अन्यायकारक संचमान्यता निकषांविरोधात पुण्यात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे धरणे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रस्तावित करण्यात आलेल्या संचमान्यतेच्या नव्या निकषांविरोधात पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने आज विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

संचमान्यतेतील नवीन निकषांमुळे शिक्षकांच्या कार्यभारात मोठी कपात होऊन हजारो शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली असून संपूर्ण महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयांवरही त्याचे गंभीर परिणाम होणार असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.



आंदोलनादरम्यान दिलेल्या घोषणांनी व अभ्यासपूर्ण भाषणांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नव्या संचमान्यता निकषांमुळे शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांचे अस्तित्व व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितावर विपरीत परिणाम होणार असल्याचे सांगितले. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे सरचिटणीस प्रा. लक्ष्मण रोडे, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. सोपान कदम, पुणे विभाग व पुणे जिल्हा संघटनेचे सरचिटणीस प्राचार्य विक्रम काळे, सोलापूर जिल्हा संघटनेचेअध्यक्ष व विभायीयकार्याधक्ष हरिदास गवळी विभागीय कार्याधक्ष हिम्मत तोबरे तसेच तीनही जिल्हा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलनादरम्यान विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी आंदोलनस्थळी येऊन शिक्षकांचे निवेदन स्वीकारले. शिक्षकांच्या मागण्या व निवेदन शासनापर्यंत सकारात्मकपणे आणि तातडीने पोहोचविण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. शिक्षक प्रतिनिधींनी संचमान्यतेतील अन्यायकारक निकष तात्काळ मागे घेण्यात यावेत, प्रचलित पद्धतीने संचमान्यता करण्यात यावी तसेच शिक्षकांची पदकपात होणार नाही याची शासनाने शासन निर्णय काढून हमी द्यावी, अशी मागणी केली.

यावेळी उपस्थित शिक्षकांनी एकजुटीने लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. आवश्यक असल्यास राज्यस्तरीय तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला.

## दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स अल्ट्रामॅरेथॉनमध्ये रनहोलिक्सने रचला इतिहास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हडपसर :** जगातील सर्वात कठीण मानल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील प्रतिष्ठित कॉम्रेड्स अल्ट्रामॅरेथॉन स्पर्धेत येथील रनहोलिक्स रनिंग क्लबच्या तब्बल ७७ जणांच्या टीमने यशस्वी कामगिरी करीत इतिहासिक रचला. या स्पर्धेसाठी भारतातून सहभागी झालेल्या मोठ्या गटांपैकी रनाहोलिक्स हा एक सर्वात यशस्वी गट ठरला.

प्रशिक्षक डॉ. योगेश सातव यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या ग्रुप मधील सदस्यांना वर्षभर नियोजनबद्ध मार्गदर्शन व शिस्तबद्ध प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे संघातील धावपटूंनी वर्षभर कठोर सराव करीत या आव्हानात्मक स्पर्धेतून स्वतःला सिद्ध केले. यातील तब्बल ७७ जणांनी निर्धारित वेळेत ही स्पर्धा पूर्ण केली. स्वतः डॉ. सातव यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत सात तास चोवीस मिनिटे शेहचाळीस सेकंद या उल्लेखनीय वेळेत शर्यत पूर्ण करून रौप्य पदक पटकावले. त्यांच्या या यशामुळे टीम रनाहोलिक्सच्या कामगिरीत मानाचा तुरा खोवला गेला.

गेल्या अनेक वर्षांपासून रनाहोलिक्स रनिंग क्लब विविध आंतरराष्ट्रीय धावण्याच्या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने धावपटूंना सहभागी करून घेत आहे. मनोरंजनात्मक धावपटूंना जागतिक स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करण्याचे आणि त्यांच्यामध्ये फिटनेस व सहनशक्तीची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य क्लब सातत्याने करीत आहे. कोम्रेड्स अल्ट्रामॅरेथॉनमधील या यशामुळे टीम रनहोलिक्सने भारतीय धावपटूंची परंपरा आणि क्रीडावारसा अभिमानाने पुढे नेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे.

## हा क्रिमिनल आहे... आम्ही त्याची वरात काढतोय; खून प्रकरणातील फरार आरोपीची पुणे पोलिसांकडून धिंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** लग्नाच्या वरातीत झालेल्या किरकोळ धक्काबुक्कीचा राग मनात धरून तरुणाचा निर्घृण खून करणाऱ्या प्रकरणातील फरार आरोपीला अखेर भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर गुरुवारी रात्री आरोपीची आंबेगाव बुद्रुक परिसरात धिंड काढत पोलिसांनी गुन्हेगारांना थेट इशारा दिला.

मयत तरुणाचे नाव तेजस दत्तात्रय पिलाने (वय २४) असे आहे. काही दिवसांपूर्वी वेल्हा तालुक्यात एका लग्नाच्या वरातीत नाचत असताना तेजसचा आरोपी विशाल खोपडे याला धक्का लागला होता. या क्षुल्लक कारणावरून दोघांमध्ये वाद झाला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. त्याचाच बदला घेण्याचा कट आरोपींनी रचल्याचा तपासात निष्पन्न झाला.

पुण्यात राहणारा तेजस पिलाने २५ एप्रिलच्या रात्री शिवसृष्टी ते कात्रज सर्व्हिस रस्त्यावरून जात असताना विशाल खोपडे आणि त्याच्या साथीदारांनी त्याला अडवले. त्यानंतर धारदार शस्त्राने वार करत त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

घटनेनंतर भारती विद्यापीठ पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत विशाल खोपडे, अभिषेक खोपडे, सचिन धुळे आणि आदिनाथ कसबे यांना काही तासांत अटक केली. मात्र या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी आदित्य काका गायकवाड हा फरार होता.

फरार आरोपीचा शोध सुरू असताना पोलिसांना तो आंबेगाव परिसरातील लेकटाऊन रोडवर येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. अटकेनंतर त्याच्याविरोधातील कारवाईचा भाग म्हणून पोलिसांनी त्याची परिसरातून धिंड काढली.

धिंडीदरम्यान भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी "हा क्रिमिनल आहे. आम्ही त्याला पकडलं आहे. तुमच्या परिसरात गुन्हे करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही.

भारती विद्यापीठ पोलीस तुमच्या सेवेत आहेत. कुणी गुन्हा केला तर आम्ही त्याची अशीच वरात काढू," असा असा इशारा गुन्हेगारांना दिला आहे..

## न्यायाच्या प्रतीक्षेत पिढ्या संपल्या, वयाची ऐंशी ओलांडली, पण 'मिळते फक्त तारीख'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** 'उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नाकारल्यासारखाच असतो' हा कायदा क्षेत्रातील नियम आज आपल्या न्यायव्यवस्थेची अत्यंत दाहक कहाणी सांगत आहे. महाराष्ट्रासह पुण्यातही, जिथे न्यायालयात खटला सुरू झाल्यानंतर २० किंवा त्याहून अधिक वर्षांनी निकाल लागला आहे तसेच अनेक कुटुंबांना आजही न्यायाची प्रतीक्षाच आहे, अशी अनेक उदाहरणे आहेत.

या प्रदीर्घ प्रवासात अनेकदा मुख्य आरोपी किंवा पक्षकार वयाची ८० वर्षे ओलांडून वृद्ध होतात. न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या मूळ पक्षकारांचा कोर्टाच्या पायऱ्या झिजवतानाच मृत्यू होतो. जर एका राजकीय नेत्याच्या हत्येचा निकाल लागून गुन्हेगारांचा छडा लागायला २० वर्षे लागत असतील, तर सामान्य गोरगरीब जनतेने न्यायाची अपेक्षा कधी आणि कोणाकडून करावी? हाच गंभीर प्रश्न आज संपूर्ण न्याय व्यवस्थेसमोर उभा ठाकला आहे

एखादा आरोपी वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडणे, जामिनावर बाहेर आले तरी वयाची ऐंशी-नव्वदी ओलांडूनही निकाल न लागणे किंवा न्यायाच्या प्रतीक्षेत मूळ पक्षकारांचाच मृत्यू होणे, हे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. विलंबाच्या या चक्रात पुरावे नष्ट होतात, साक्षीदार मृत्युमुखी पडतात किंवा फितूर होतात आणि सरतेशेवटी खटला लांबतो. न्यायालयातील अशा दीर्घकालीन दिरंगाईचा थेट परिणाम शेवटी सामान्य माणसाच्या आयुष्यावरही होत असतो. पुण्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये हडपसर येथील ६१ वर्षीय नामदेव जाधव यांनी पुण्याच्या शिवाजीनगर जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली. त्यांच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये १९९८ पासून प्रलंबित असलेल्या एका दिवाणी खटल्याचा उल्लेख होता. तब्बल २७ वर्षे न्यायाची वाट पाहून थकलेल्या आणि हताश झालेल्या या सामान्य नागरिकाला अखेर न्यायालयाच्याच आवारात आपले आयुष्य संपवावे लागले.

पुण्यातील राठी कुटुंबाचा १९९४ मधील हत्याकांडाचा खटला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन अंतिम निकाल येण्यासाठी तब्बल २८ वर्षे चालला. यापेक्षाही हृदयद्रावक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील एका व्यक्तीचा मुंबई उच्च न्यायालयात २७ वर्षे खटला प्रलंबित राहिला अन् केवळ वकिलांच्या गैरहजेरीमुळे फेटाळण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये त्यांच्या अपिलाची दखल घेतली, परंतु दुर्दैवाने या १०८ वर्षांच्या वृद्धाचा अंतिम निकाल लागण्यापूर्वीच मृत्यू झाला.

## सारांश वृत्त

### '१०० कोटींच्या जमिनीपासून १९ एकरच्या भूखंडापर्यंत; काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या कुटुंबावर भाजपचा गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भाजपने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांच्या कुटुंबावर थेट जमीन घोटाळ्याचाच आरोप केला आहे. जमिन वाटपावरून हा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ''कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात खर्गे कुटुंबाशी संबंधित 'सिद्धार्थ विहार ट्रस्ट'ला नियमांचे उल्लंघन करून जमिनींचे वाटप करण्यात आले आणि सार्वजनिक जमीन खाजगी ट्रस्टच्या नियंत्रणात देण्यात आली'', असा दावा भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केला आहे. या संदर्भात पत्रकार परिषदेत बोलताना भाजप प्रवक्ते प्रदीप भंडारी म्हणाले, ही कथित ''जमीन लूट'' पहिली घटना नाही, तर अशा अनेक घटनांची एक मालिकाच आहे. जी प्रकरणे भाजप आगामी काळात समोर आणेलच. ''जमीन लुटीचे पहिले प्रकरण म्हणजे, सिद्धार्थ विहार ट्रस्टचे प्रकरण. २०२४ मध्ये कर्नाटक इंडस्ट्रियल एरिया डेव्हलपमेंट बोर्डाने (घखअृइ) या ट्रस्टला पाच एकर जमीन दिली होती. त्या वेळी कर्नाटकात काँग्रेसचे सरकार होते, आजही आहे. मल्लिकार्जुन खर्गे काँग्रेस अध्यक्ष होते, आजही आहेत. तर प्रियांक खर्गे हे मंत्री होते.''

भंडारी पुढे म्हणाले, ''या जमिनीचा घोषित उद्देश एरोस्पेस आणि डिफेन्स क्षेत्रात संशोधन आणि विकास (ठृ) करणे हा होता. या पाच एकर जमिनीचे सध्याचे बाजारमूल्य सुमारे १०० कोटी रुपये एवढे आहे. ही जमीन ज्या उद्देशाने घेतली गेली, त्या दृष्टीने कुठलेही काम झालेले नाही. ही जमीन एखाद्या औद्योगिक किंवा एरोस्पेस संस्थेला मिळायला हवी होती. मात्र, त्याऐवजी ती काँग्रेस अध्यक्षांच्या खाजगी ट्रस्टला देण्यात आली.

# जंतर मंतरवरील आंदोलन आणि नव्या अण्णा आंदोलनची तुलना : वास्तव, मर्यादा आणि राजकीय अर्थ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : जंतर मंतर येथे झालेल्या एका राजकीय-सामाजिक आंदोलनानंतर काही मंडळींनी त्याची तुलना २०११ च्या अण्णा हजारे आंदोलनाशी करण्याचा प्रयत्न केला. मात्र **Indian Express** मधील मतलेखानुसार ही तुलना वास्तवापासून दूर आहे. लेखकाच्या मते, **Cockroach Janata Party (CJP)** किंवा तत्सम स्वरूपातील ही चळवळ अण्णा आंदोलनासारखी व्यापक जनआंदोलनाची क्षमता ठेवत नाही. ही केवळ सोशल मीडिया-आधारित प्रतिक्रिया असून तिला दीर्घकालीन राजकीय परिणाम देणारी संघटनात्मक ताकद नाही.

अण्णा हजारे आंदोलन आणि सध्याच्या आंदोलनांमध्ये मूलभूत फरक आहे. २०११ चे आंदोलन हे केवळ एखाद्या दिवशीचे प्रदर्शन नव्हते, तर त्यामागे वर्षानुवर्षे तयार झालेले नागरी समाजाचे जाळे होते. भ्रष्टाचारविरोधी वातावरण, शहरांतील मध्यमवर्गीयांचा मोठा सहभाग आणि राष्ट्रीय स्तरावरील मीडिया कव्हरेज यामुळे त्या आंदोलनाला व्यापक वैधता मिळाली होती. त्या काळात लोकपाल विधेयकाच्या मागणीभोवती एक स्पष्ट, एकसूत्री अजेंडा होता.

याउलट सध्याच्या जंतर मंतरवरील आंदोलनात स्पष्ट नेतृत्व, दीर्घकालीन रणनीती आणि संस्थात्मक बांधणीचा अभाव दिसून येतो. सोशल मीडियावर निर्माण झालेला उत्साह आणि प्रत्यक्ष मैदानावरील उपस्थिती यामध्ये मोठी दरी असल्याचे निरीक्षण लेखात नोंदवले आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर मिळणारा प्रतिसाद हा अनेकदा क्षणिक असतो, तर राजकीय आंदोलन टिकण्यासाठी संघटनात्मक पाया आवश्यक असतो.

आजच्या राजकीय वातावरणात व्हायरल मोव्हमेंट्स झपाट्याने उभ्या राहतात आणि तितक्याच वेगाने अदृश्य होतात. या पार्श्वभूमीवर **CJP** सारख्या गटांना मिळणारा ऑनलाइन पाठिंबा हा वास्तविक राजकीय शक्तीत रूपांतरित होईलच असे नाही. भारतीय राजकारण अजूनही बूथ स्तरावरील संघटन, जातीय-सामाजिक समीकरणे आणि स्थानिक नेतृत्व यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे केवळ डिजिटल लोकप्रियतेच्या आधारावर राष्ट्रीय आंदोलन उभे राहील, हा समज चुकीचा ठरतो.

लेखात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहेमाध्यमांची भूमिका. अण्णा आंदोलनाच्या काळात मुख्य प्रवाहातील माध्यमांनी त्याला प्रचंड कव्हरेज दिले होते. त्याचा परिणाम म्हणून आंदोलन देशभर पोहोचले आणि त्याला व्यापक वैधता मिळाली. सध्याच्या आंदोलनांना तसा एकसंध मीडिया पाठिंबा मिळालेला दिसत नाही. माध्यमांचे तुकडीकरण, डिजिटल प्लॅटफॉर्मचे वाढते वर्चस्व आणि प्रेक्षकांचे विभाजन यामुळे कोणतेही आंदोलन पूर्वीइतके एकसंधपणे राष्ट्रीय स्तरावर पोहोचत नाही.

**CJP** किंवा तत्सम गटांचे आणखी एक मर्यादित वैशिष्ट्य म्हणजे नेतृत्वाचा अस्पष्टपणा. अण्णा आंदोलनात अण्णा हजारे हे प्रतीकात्मक नेतृत्व होते, तर अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या टीमने त्याला राजकीय दिशा दिली. त्यामुळे आंदोलनाचा प्रवास नागरी समाजापासून राजकारणाकडे स्पष्टपणे झाला. सध्याच्या आंदोलनांमध्ये अशा प्रकारचा संक्रमण मार्ग किंवा ठोस राजकीय आराखडा दिसत नाही. याशिवाय, अण्णा आंदोलनाच्या वेळी भ्रष्टाचार हा सर्वसमावेशक मुद्दा होता. तो प्रत्येक वर्गाला जोडणारा भावनिक आणि नैतिक मुद्दा बनला होता. आजच्या आंदोलनांमध्ये मात्र मुद्दे अधिक तुकड्यात विभागलेले आहेत. त्यामुळे व्यापक जनसमर्थन तयार होण्यास अडचण येते.

लेखकाचा निष्कर्ष स्पष्ट आहेजंतर मंतरवरील हे आंदोलन नवे अण्णा आंदोलन ठरू शकत नाही. ते एक मर्यादित, सोशल मीडिया-केंद्रित प्रतिक्रिया आहे, ज्यामध्ये दीर्घकालीन राजकीय संरचना निर्माण करण्याची क्षमता नाही. आंदोलनाचे स्वरूप जितके डिजिटल झाले आहे, तितकेच त्याचे आयुष्यही क्षणभंगुर झाले आहे. तथापि, हा निष्कर्ष केवळ नकारात्मक नाही. तो भारतीय राजकारणातील बदलत्या स्वरूपावर प्रकाश टाकतो. आजच्या काळात कोणतेही आंदोलन उभे करणे सोपे झाले आहे, परंतु ते टिकवणे आणि त्यातून धोरणात्मक बदल घडवणे अधिक कठीण झाले आहे. लाईक्स आणि शेअर्स हे राजकीय शक्तीचे पर्याय ठरू शकत नाहीत.

अखेरीस, जंतर मंतरवरील आंदोलनाने एक गोष्ट स्पष्ट केली आहेभारतीय राजकारणात डिजिटल उत्साह आणि वास्तविक राजकीय संघटन यामध्ये मोठे अंतर आहे. अण्णा आंदोलनासारखे यशस्वी जनआंदोलन उभे राहण्यासाठी केवळ नाराजी पुरेशी नसते; त्यासाठी शिस्तबद्ध संघटन, स्पष्ट नेतृत्व आणि दीर्घकालीन धोरण आवश्यक असते. सध्याच्या आंदोलनात या तिन्ही घटकांची कमतरता असल्यामुळे त्याची तुलना ऐतिहासिक अण्णा आंदोलनाशी करणे वास्तवाशी विसंगत ठरते.

# शैक्षणिक अभ्यासक्रमातील हस्तक्षेप घटनाबाह्य दिशेने जाणारा? NCERT बदलांवर गंभीर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील **NCERT** ने नववीच्या सामाजिक विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातून संविधानाची प्रस्तावना वगळणे तसेच 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' या महत्त्वाच्या संकल्पनांचा उल्लेख काढून टाकणे हा शैक्षणिक बदल नसून संविधानाच्या मूलभूत भावनेवर परिणाम करणारा निर्णय असल्याचा गंभीर आरोप होत आहे. या बदलामुळे शालेय शिक्षणातील शैक्षणिक स्वायत्तता आणि घटनात्मक मूल्ये यावर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

भारतीय संविधानाची प्रस्तावना ही केवळ सुरुवातीचा मजकूर नसून देशाच्या राज्यव्यवस्थेची मूलभूत विचारधारा आहे. त्यात नमूद केलेली 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष', 'लोकशाही' आणि 'गणराज्य' ही मूल्ये भारतीय शिक्षणव्यवस्थेतील नागरिकशास्त्राचा पाया मानली जातात. अशा मूलभूत संकल्पनांना अभ्यासक्रमातून वगळणे हे विद्यार्थ्यांच्या घटनात्मक समजुतीवर मर्यादा आणणारे ठरू शकते, अशी चिंता शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यासक्रमात सुधारणा करणे हा अधिकार संबंधित संस्थांचा असला तरी, तो बदल संविधानातील मूलभूत तत्त्वांशी विसंगत किंवा त्यांना कमी महत्त्व देणारा असल्यास तो घटनात्मक मूल्यांच्या आत्म्याला धक्का पोहोचवतो, असा आक्षेप नोंदवला जात आहे. शिक्षण हे केवळ माहिती देण्याचे साधन नसून लोकशाही मूल्यांची रुजवणूक करणारे माध्यम आहे. त्यामुळे संविधानाच्या मूलभूत संकल्पनांचे शिक्षणातून कमीकरण हे शैक्षणिक उद्दिष्टांशी विसंगत मानले जाते. पुस्तकात आणीबाणी **(Emergency)** या विषयाचा समावेश करून त्या काळातील राजकीय घडामोडी, मूलभूत अधिकारांचे निलंबन आणि लोकशाहीवरील परिणाम यांचे वर्णन करण्यात आले आहे. तसेच जनआंदोलने आणि जयप्रकाश नारायण यांची भूमिका यावर भर देण्यात आला आहे. मात्र, या ऐतिहासिक घटनांच्या वर्णनासोबतच संविधानाच्या तत्त्वज्ञानाचा समतोल कमी झाल्याची टीका होत आहे.

घटनात्मक तज्ज्ञांच्या मते, शालेय अभ्यासक्रमात संविधानाच्या मूलभूत तत्त्वांची उपस्थिती कमी करणे हे अप्रत्यक्षपणे नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांविषयी अपूर्ण समज निर्माण करू शकते. त्यामुळे हा बदल केवळ शैक्षणिक पुनर्रचना नसून घटनात्मक शिक्षणाच्या दिशेवर परिणाम करणारा निर्णय असल्याचे मत मांडले जात आहे.

शिक्षण क्षेत्रातील स्वायत्त संस्था अभ्यासक्रम तयार करत असल्या तरी, तो अभ्यासक्रम संविधानातील मूलभूत मूल्यांशी सुसंगत असणे आवश्यक आहे. अन्यथा, शिक्षण व्यवस्थेतील बदल हे घटनात्मक उद्दिष्टांशी विसंगत ठरण्याचा धोका निर्माण होतो.

एकूणच, छइएठढ चा हा बदल शैक्षणिक सुधारणा आहे की संविधानाच्या मूलभूत तत्त्वांपासून दूर जाण्याची प्रक्रियाहा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे. शिक्षणातील घटनात्मक मूल्यांचे संरक्षण ही केवळ शैक्षणिक जबाबदारी नसून लोकशाही व्यवस्थेची मूलभूत गरज असल्याचे मत या निमित्ताने पुढे आले आहे.

## सगळ्यांची अंडी-पिल्ली माहितीयेत, मुलगा दोषी असेल तर कारवाई करा; खासदार सोनवणे यांनी सगळंच सांगितलं

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** बीडमधील विलास घुले हत्याप्रकरणावरुन बीडमध्ये राजकारण तापले आहे. हा हत्येतील आरोपींना शिक्षा व्हावी या मागणीसाठी मागणी होत आहे. आमदार धनंजय मुंडे यांनी याबाबत विधानसभेत मागणी केली. या हत्येप्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर मुलावर आरोप केले जात आहेत. यावर आता खासदार सोनवणे यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी आमदार धनंजय मुंडे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. आज खासदार बजरंग सोनवणे यांनी विलास घुले हत्या प्रकरणात अचानक मुलाचे नाव पुढे कसे आले? असा सवाल उपस्थित करत विरोधकांवर टीका केली. तसेच ''माझा मुलगा दोषी असेल तर त्याच्यावर कठोर कारवाई करावी, मी दोषी असेन तर माझ्यावर कारवाई करावी'', अशी मागणी खासदार सोनवणे यांनी केली.

केज तालुक्यातील विलास घुले हत्येप्रकरणी खासदार सोनवणे यांचा मुलगा सौरभ सोनवणे याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. आमदार मुंडे यांनी या प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, पत्रकार परिषदेत आज खासदार सोनवणे यांनी मुंडे यांचा एकेरी उल्लेख केला. ते काय म्हणतंय ते जाऊद्या, त्याच्या अगोदर मी चौकशीची मागणी केली, मी माथे भडकवायची कामं करत नाही, लोकांना शांत करुन त्यांना न्याय द्यायचं काम करतो. त्या कुटुंबाला सहकार्य झालं पाहिजे. आणि खरंच माझा मुलगा दोषी असेल तर त्याच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे, मुलाला कुठेही पळवून लावत नाही, तो तिथेच आहे, त्याची चौकशी करावी, अशी मागणी खासदार सोनवणे यांनी केली.

## राजस्थान उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय: पॉक्सो प्रकरणात सीआरपीएच कलम ३११ चा उद्देश 'सत्य शोधणे'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर :** राजस्थान हाय कोर्ट ने जस्टीस अनुपकुमार यांच्या खंडपीठामार्फत दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात स्पष्ट केले की, **Section 311 of the Code of Criminal Procedure** चा उद्देश कोणत्याही पक्षाला (फिर्यादी किंवा आरोपी) लाभ मिळवून देणे नसून सत्य समोर आणणे आणि न्याय्य निर्णय होण्यासाठी आवश्यक पुरावे उपलब्ध करून देणे हा आहे.

या प्रकरणात **Protection of Children from Sexual Offences Act** अंतर्गत चाललेल्या खटल्याच्या अंतिम टप्प्यात पीडितेच्या दुसऱ्या शाळेचे मूळ प्रवेश अभिलेख आणि संबंधित प्राचार्यांना समन्स बजावण्यास न्यायालयाने परवानगी दिली.

प्रकरणात पीडितेच्या जन्मतारखेबाबत गंभीर विसंगती आढळली होती. विविध शाळांच्या प्रवेश नोंदी आणि दहावीच्या गुणपत्रिकेत जन्मवर्ष अनुक्रमे १९९९, २००० आणि २००१ असे नमूद असल्याने, घटना घडली तेव्हा पीडिता सज्ञान होती, असा आरोपीचा दावा होता.

न्यायालयाने **Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015** मधील तरतुदींचा संदर्भ देत सांगितले की, वयाबाबत शंका असल्यास शाळेची नोंद किंवा शिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र हे महत्त्वाचे आणि ग्राह्य पुरावे मानले जातात. त्यामुळे योग्य वय निश्चित करण्यासाठी संबंधित शाळेचे मूळ रेकॉर्ड मागवणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

या निर्णयाचा महत्त्वाचा संदेश: न्यायालयाने अधोरेखित केले की, कलम ३११ चा वापर खटल्यातील त्रुटी भरून काढण्यासाठी किंवा एखाद्या पक्षाला फायदा करून देण्यासाठी नव्हे, तर सत्य शोधून न्यायाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी केला जावा.

## भारतात एफडीआय आकर्षण मजबूत, पण टिकवणे मोठे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत परकीय थेट गुंतवणूक **(FDI)** आकर्षित करण्यात यशस्वी ठरत असला तरी ती गुंतवणूक दीर्घकाळ देशात टिकवणे हे अधिक मोठे आव्हान असल्याचे निरीक्षण **Indian Express** मधील मतलेखात नोंदवण्यात आले आहे.

भारताची मोठी बाजारपेठ, तरुण लोकसंख्या, डिजिटल पायाभूत सुविधा आणि सुधारत असलेले व्यवसाय वातावरण यामुळे देशात **FDI** प्रवाह कायम आकर्षक राहिला आहे. मात्र, गुंतवणूकदारांकडून येणारे भांडवल दीर्घकाळ टिकून राहण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याचेही विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, अनेक वेळा परकीय गुंतवणूकदार नफा काढून घेऊन देशातून बाहेर पडतात किंवा नवीन गुंतवणूक टाळतात. त्यामुळे एकूण नेट **FDI** अपेक्षित पातळीवर पोहोचत नाही.

गुंतवणूक वातावरणात जागतिक स्तरावरही अस्थिरता आहे. भूराजकीय तणाव, व्यापारातील अनिश्चितता आणि जागतिक आर्थिक मंदी यामुळे गुंतवणूक प्रवाहावर परिणाम होत आहे. मात्र भारतातील अंतर्गत घटकही तितकेच




महत्त्वाचे ठरत आहेत.

नियामक गुंतागुंत, कर धोरणांतील बदल, अनुपालनातील अडथळे आणि व्यवसाय सुलभतेतील मर्यादा यामुळे काही गुंतवणूकदार दीर्घकालीन बांधिलकी दाखवताना सावध भूमिका घेत असल्याचे दिसते.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारतात गुंतवणूक करणे तुलनेने सोपे झाले असले तरी ती गुंतवणूक टिकवणे आणि वाढवणे हे अजूनही कठीण आहे. त्यामुळेच काही कंपन्या बाजारात प्रवेश करतात, पण नंतर विस्तार मर्यादित ठेवतात किंवा बाहेर पडतात.

राज्यस्तरावरील प्रशासन, पायाभूत सुविधा आणि स्थानिक नियम यांचाही गुंतवणूक टिकवण्यात महत्त्वाचा वाटा असल्याचेही या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे.

एकूणच, भारतासाठी पुढील टप्पा केवळ ऋऊख आकर्षित करण्याचा नसून गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवून ठेवण्याचा आहे, असे मत या लेखात व्यक्त करण्यात आले आहे.

## भारतात सुरू झाली पहिली खाजगी सोन्याची खाण; 'या' गावातून निघणार वर्षाला टनभर सोनं

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कुर्नूल :** भारतीय खाण क्षेत्रात बुधवारचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. आंध्र प्रदेशातील कुर्नूल जिल्ह्यातील तुग्गली मंडालात असलेल्या 'स्वर्णगिरी' येथे देशातील पहिल्या खाजगी सोन्याच्या खाणीतून व्यावसायिक उत्पादन अधिकृतपणे सुरु झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या खाणीचे उद्घाटन केले असून, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात सुरु झालेली ही एकमेव खाजगी प्राथमिक सोन्याची खाण आहे.

या प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेऊन आंध्र प्रदेश कॅबिनेटने उद्घाटनापूर्वीच या भागातील 'जोन्नागिरी' गावाचे नाव बदलून अधिकृतपणे 'स्वर्णगिरी' ठेवण्यास मंजुरी दिली. हा प्रकल्प 'जिओमायसोरे सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'डरे चालवला जात आहे. सुमारे ४०५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभारलेला हा सोन्याचा खाण प्रकल्प तब्बल ५९८ हेक्टर परिसरात पसरलेला आहे.

या महत्त्वाकांक्षी स्वर्णगिरी गोल्ड प्रोजेक्टमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ७०० लोकांना थेट रोजगार मिळेल, ज्यापैकी ८०% कर्मचारी स्थानिक समुदायातून असतील. सोन्याच्या उत्पादनातून राज्य सरकारला दरवर्षी कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी आणि कर मिळणार आहे. या खाणीमध्ये मे महिन्यापासूनच चाचणी सुरु होती, तर आता व्यावसायिक उत्पादनाला गती दिली जाईल. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये या खाणीतून सुमारे ४०० किलोग्रॅम सोन्याच्या उत्पादनाचा अंदाज आहे. आगामी काळात हे उत्पादन वार्षिक १ टनापर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. या प्रकल्पाच्या विस्तारासाठी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या हस्ते दुसऱ्या प्रोसेसिंग युनिटची पायाभरणीही केली जाणार आहे, ज्यामुळे खाणीची एकूण क्षमता प्रतिवर्ष २ टनांपर्यंत पोहोचू शकते. या प्रकल्पासाठी 'हरी नीवा सुजलास्रवणथी' योजनेतून १८ किलोमीटर लांबीच्या पाईपलाईनद्वारे सुमारे ०.०२१ टीएमसी पाणी पुरवले जात आहे. डेक्कन गोल्ड माइन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मोदली हनुम प्रसाद यांच्या मते, हा प्रकल्प भारतातील खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून आधुनिक आणि शाश्वत खाण तंत्रज्ञानाची क्षमता दर्शवतो. आंध्र प्रदेशात सोन्याचे मोठे साठे असून, यामुळे वैज्ञानिक खाणकामाला चालना मिळेल. याशिवाय, राज्यातील इतर संभाव्य सोन्याच्या क्षेत्रांचाही शोध सुरु आहे.

# राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरण; चंपत राय यांचे निकटवर्तीय टिन्नूसह आठ जणांना अटक, एसआयटी तपासात मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या :** अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिरातील देणगी व्यवस्थापनाशी संबंधित कथित गैरव्यवहार प्रकरणात उत्तर प्रदेश पोलिसांनी मोठी कारवाई करत श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांचे निकटवर्तीय आणि चालक म्हणून ओळखले जाणारे रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांच्यासह आठ जणांना अटक केली आहे. या कारवाईमुळे मंदिरातील देणगी व्यवस्थापनावर सुरू असलेल्या वादाला नवे वळण मिळाले असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) सुरू आहे.

राम मंदिरात भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या स्वरूपात देणग्या प्राप्त होतात. या देणग्यांच्या मोजणी, नोंदणी आणि सुरक्षित साठवण प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप काही दिवसांपूर्वी करण्यात आला होता. समाजवादी पक्षाच्या एका आमदाराने या संदर्भात सार्वजनिकरित्या प्रश्न उपस्थित केल्यानंतर हा मुद्दा राजकीय चर्चेचा विषय बनला. त्यानंतर श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टनेही या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी भूमिका घेत उत्तर प्रदेश सरकारकडे तपासाची मागणी केली.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना केली. एसआयटीने प्राथमिक चौकशीत उपलब्ध कागदपत्रे, आर्थिक नोंदी, सीसीटीव्ही फुटेज तसेच संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी केली. या तपासात काही संशयास्पद बाबी समोर आल्यानंतर एफआयआर दाखल करण्यात आला आणि त्यानंतर पोलिसांनी आठ संशयितांना अटक केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले सर्व आरोपी मंदिरातील देणग्यांच्या मोजणी, वर्गीकरण, साठवण किंवा वाहतूक प्रक्रियेशी थेट अथवा अप्रत्यक्षपणे संबंधित होते. त्यामध्ये रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांचाही समावेश आहे. टिन्नू हे ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांचे निकटवर्तीय आणि चालक म्हणून ओळखले जात असल्याने या अटकेकडे विशेष लक्ष वेधले गेले आहे. मात्र, तपास यंत्रणांनी स्पष्ट केले आहे की, अटक ही उपलब्ध पुरावे आणि तपासाच्या आधारे करण्यात आली असून चौकशी अद्याप सुरू आहे.

एसआयटीकडून आर्थिक व्यवहारांचे परीक्षण, बँक खात्यांची तपासणी, सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण तसेच जप्त करण्यात आलेल्या रोख रकमेची पडताळणी केली जात आहे. या प्रकरणात आणखी काही व्यक्तींची चौकशी होण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच कथित गैरव्यवहाराचे नेमके स्वरूप आणि जबाबदारी निश्चित होणार आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. विरोधी पक्षांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी केली आहे. मंदिरात भाविकांकडून अर्पण होणाऱ्या देणग्यांच्या व्यवस्थापनाबाबत अधिक पारदर्शक यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे मतही काही नेत्यांनी व्यक्त केले आहे.

दुसरीकडे, उत्तर प्रदेश सरकारने कायद्यापुढे सर्वजण समान असल्याची भूमिका मांडत तपास कोणताही राजकीय हस्तक्षेप न होता सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टनेही तपास यंत्रणांना पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका घेतली असून वस्तुस्थिती लवकरात लवकर समोर यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.